दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com

संपादक : अजय भांगे

https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | शनिवार दि.७ मार्च २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक १९० | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Saturday 7 March 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 190 | Pages 4 | Rate 4 Rs


### लाडकी बहीण योजना अशीच सुरू राहणार

**मुंबई**–आज राज्याचा अर्थसंकल्प मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केला. यात शेतकऱ्यांसाठी कर्जमाफीची महत्त्वाची घोषणा करण्यात आली. विशेष म्हणजे सर्वांचे लक्ष असलेल्या लाडकी बहीण योजनेसंदर्भात देखील मुख्यमंत्र्यांनी महत्त्वाची घोषणा केली आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही अशीच सुरू राहणार असल्याची मोठी घोषणा त्यांनी केली आहे. तसेच या योजनेसाठी भरीव तरतूद केली असल्याचे देखील त्यांनी सांगितले.देवेंद्र फडणवीस म्हणाले, येणाऱ्या ८ मार्च रोजीच्या जागतिक महिला दिनानिमित्त राज्यातील सर्व लाडक्या बहिणींना मी शुभेच्छा देतो. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' ही योजना अशीच सुरू राहणार आहे व या योजनेसाठी आवश्यक ती भरीव तरतूद करण्यात आली आहे.यावर विरोधकांनी लाडक्या बहिणींचे अनुदान १५०० रुपयांवरुन २१०० रुपये करण्याच्या दिलेल्या आश्वासनाबद्दल विचारले असता देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले की, काळजी करु नका तुमच्या मनातील गोष्टी आम्हीच पूर्ण करणार. फक्त योजनेच्या विरोधात कोर्टात जाऊ नका, असे म्हणत त्यांनी विरोधकांना टोलाही लगावला आहे.

# राज्यातील शेतकऱ्यांना २ लाखापर्यंत कर्जमाफी

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा; ७ लाख ६९ हजार ४६७ कोटींचा अर्थसंकल्प सादर

विधानसभा निवडणुकीला सामोरे जाताना महायुती सरकारने दिलेल्या आश्वासनाची प्रत्यक्ष पूर्तता करताना, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी शेतकऱ्यांना २ लाखापर्यंत कर्जमाफी देण्याची घोषणा केली. त्यासोबतच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना कायम ठेवताना, त्यासाठी भरीव तरतूद करण्याची घोषणाही मुख्यमंत्र्यांनी केली. यंदाच्या अर्थसंकल्पाचे आकारमान तब्बल ७ लाख ६९ हजार ४६७ कोटी इतके आहे.दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अनुपस्थितीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०२६-२७ साठीचा अर्थसंकल्प जाहीर केला. विधान परिषदेत अर्थराज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी राज्याचा अर्थसंकल्प मांडला. मुख्यमंत्री म्हणाले, आम्ही निवडणुकीत केलेल्या घोषणेनुसार, राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यासाठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना' मी जाहीर करीत आहे. ३० सप्टेंबर २०२५ रोजी पीककर्ज थकित असलेल्या पात्र शेतकर्यांना २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी दिली जाईल. नियमित कर्ज परतफेड करणार्या पात्र शेतकर्यांना प्रोत्साहन म्हणून ५० हजार रुपये अनुदानही दिले जाईल.



दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

कर्जमाफी आणि प्रोत्साहनपर लाभ देण्यासोबतच बँकिंग यंत्रणा सक्षम करण्यासाठी, तसेच शेतकऱ्यांना कायमस्वरुपी कर्जमुक्त करण्यासाठी समितीच्या शिफारसींनुसार कार्यवाही करणार आहोत, असेही त्यांनी सांगितले. आमच्या सरकारने जून ते ऑक्टोबर २०२५ पर्यंत शेतकर्यांना १५ हजार ४९२ कोटी रुपये वितरित केले. आता शेतीमालाला जागतिक बाजारपेठ देण्यासाठी १० ते १५ पिकांची एकात्मिक मूल्यसाखळी निर्माण करणार आहोत, अशी घोषणाही मुख्यमंत्र्यांनी केली. ॲग्रीस्टॅक, महावेध, क्रॉपसॅप, महाडीबीटी, को. ऑप स्टॅक इत्यादी डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून एकात्मिक इकोसिस्टीम उभारणार असल्याचे त्यांनी सांगितले.




### लाडकी बहीण योजना कायम राहणार

मुख्यमंत्री म्हणाले, लाडकी बहीण योजना बंद करणार, अशा वावड्या निवडणुकीत आणि त्यानंतरही उठण्यात आल्या. मात्र, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना कायम राहणार असून, या अर्थसंकल्पात त्यात भरीव तरतूद करण्यात आली आहे. त्याशिवाय सर्व जिल्ह्यांत एकल महिलांचे सर्वेक्षण सुरू करण्यात आले असून, या अहवालाचे विश्लेषण करून एकल महिलांसाठी विशेष धोरण आणले जाणार आहे.राज्यात आतापर्यंत २७ लाख लखपती दिदी झाल्या. २०२६-२७ मध्ये आणखी २५ लाख लखपती दिदी करणार आहोत. त्याव्यतिरिक्त महिला बचतगटांच्या वस्तू उत्पादन, विक्रीसाठी १३ जिल्ह्यांत उमेद मॉल उभारले जाणार आहेत. अंगणवाडी सेविकांना आर्थिक नियोजनाबाबत प्रशिक्षण, योजनेतील लाभार्थ्यांना आर्थिक साक्षर करुन लाभाचे व्यवस्थापन, गुंतवणुकीचे मार्गदर्शन करणार आहोत.

### कृषी क्षेत्रातील भांडवली गुंतवणूक वाढवणार

मुख्यमंत्री म्हणाले, शेतीत एआयचा वापर सुरू करण्यात आला आहे. महाविस्तार एआय, वसुधा व्हॉईस टेलिफोनी, पुश टेलिफोनी, महाराष्ट्र ॲग्रीकल्चर डेटा एक्सचेंज, एआय सक्षम सँडबॉक्स इत्यादी उपक्रम सुरू करण्यात आले आहे. यापुढे ४ कृषी विद्यापीठांमध्ये एआय क्षमता आणि कृषी स्टार्टअपला प्रोत्साहन देण्यासाठी आर्टिफिशियल इंटिलिजन्स इनोव्हेशन अँड इन्क्युबेटर सेंटरची स्थापना करणार आहोत. जेणेकरून उत्पादन खर्चात २५ टक्के घट होऊन उत्पादकता वाढीला चालना मिळेल.जानेवारी २०२६ पर्यंत १ कोटी ३१ लाख फार्मर्स आयडी तयार करण्यात आले आहेत. आता त्यात आदिवासी वनपट्टेधारक शेतकरी समाविष्ट करणार आहोत. कृषी समृद्धी योजनेंतर्गत २०२६-२७ पासून ४ वर्षांत भांडवली गुंतवणूक वाढवली जाणार आहे. त्याशिवाय नवीन प्राकृतिक शेती अभियानांतर्गत ५ लाख हेक्टर क्षेत्र प्राकृतिक शेतीखाली आणण्याचे उद्दिष्ट असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

# दहा महिन्यांपासून खुनाच्या गुन्ह्यातील फरार आरोपी युसुफ वडगाव पोलीसांच्या ताब्यात

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**




दहा महिन्यापासून असलेल्या खुनाच्या गुन्ह्यातील फरार आरोपीला सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिन्द्रनाथ शेंडगे व त्यांच्या सहकाऱ्यांनी बुधवारी पळसखेडा शिवारात जेरबंद करून गुरूवारी न्यायालया समोर हजर केले असता न्यायालयाने आरोपीला पाच दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

केज तालुक्यातील युसूफवडगाव पोलीस ठाणे हद्दीतील लाडेगाव शिवारात दि. २७ मे २०२५ रोजी दगडू उर्फ अण्णा ज्ञानेश्वर धपाटे, रा.भाटुंबा यांच्या खून प्रकरणातील दाखल गुन्ह्यातील आरोपी आशिष बळीराम अंबाड रा.अंबाजोगाई हा मागील दहा महिन्यांपासून फरार होता.मागील दहा महिन्यांपासून सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे व त्यांचे पथक या आरोपी च्या मागावर होते. बुधवार दि.४ मार्च रोजी या आरोपीबाबत गुप्त खबऱ्या मार्फत माहिती मिळाल्यावरुन आरोपी आशिष बळीराम अंबाड यास पळसखेडा शिवारातून सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिन्द्रनाथ शेंडगे, पोलीस उपनिरीक्षक छाया वाघमारे (कोमटवार),व पोलीस धनंजय कारले यांनी अटक केली.गुरूवार दि.५ मार्च रोजी आरोपी ला केज न्यायालयासमोर हजर केले असता मा. न्यायालयाने आरोपीला दि.९ मार्च पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे हे करीत आहेत.दरम्यान मुख्य आरोपीला अटक केली असल्याने खुन का केला याचा तपास लागणार असल्याचे चित्र दिसून येत आहे.

# केज येथील दोन महाविद्यालयातून दोन विद्यार्थिनी गायब; पालक वर्गात चिंतेचे वातावरण

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज शहरातील दोन महाविद्यालयातील दोन तरुणी अचानक बेपत्ता झाल्यामुळे तालुक्यात व महाविद्यालय परिसरात एकच खळबळ उडाली आहे.केज तालुक्यातील नामेवाडी येथील जयश्री मधुकर केदार वय २२वर्ष ही विद्यार्थिनी केज शहरातील जीवन शिक्षण महाविद्यालयात बी.एस्सी द्वितीय वर्षात शिक्षण घेणारी विद्यार्थिनी बुधवार दि.४ मार्च रोजी सकाळी साडे आकरा वाजता आपल्या वडिलां सोबत परीक्षा फीस भरण्यासाठी महाविद्यालयात आली होती.परिक्षा फीस भरल्यानंतर दोघेही आवारातील कठड्यावर बसले होते.दरम्यान दुपारी दोन वाजण्याच्या दरम्यान जयश्री केदार ही वडिलांची नजर चुकवून बेपत्ता झाली




आहे.पाहूणे व नातेवाईकांकडे तिचा शोध घेतला असता ती मिळून आली नाही. वडिल मधुकर केदार यांच्या फिर्यादीवरून गुरूवारी केज पोलीस ठाण्यात या प्रकरणी हरवली असल्याची नोंद करण्यात आली आहे.तर दुसरी घटना काळेगाव (घाट) येथील योगेश्वरी नंदकिशोर कोठावळे वय अठरा वर्षे ही विद्यार्थिनी भाऊसाहेब पाटील अध्यापक विद्यालयात शिक्षण घेत आहे. सोमवार दि.२ मार्च रोजी दुपारी अडीच वाजण्या च्या दरम्यान ती अद्यापक विद्यालयातून कोणालाही न सांगता निघून गेली आहे.वडिल नंदकिशोर कोठावळे यांच्या फिर्यादी नुसार केज पोलीस ठाण्यात हरवल्याची नोंद करण्यात आली आहे. अवघ्या तीन दिवसात केज शहरातील दोन महाविद्यालयीन वेगवेगळ्या घटनेत दोन तरुणी बेपत्ता झाल्या असल्याने पालकांत भीतीचे वातावरण पसरले आहे.या प्रकरणी पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शना खाली जमादार हनुमान मुंडे व जमादार शकील शेख हे पुढील तपास करीत आहेत.दरम्यान योगेश्वरी ही आळंदी देवाची येथे असल्याची माहिती मिळाली आसून लवकरच या प्रकरणा तील आरोपीसह दोघांना ही ताब्यात घेण्यात येणार असल्याची माहिती जमादार शकील शेख यांनी प्रतिनिधीशी बोलताना दिली आहे. दरम्यान या घटनेनंतर केज शहरात खळबळ उडाली आहे.

# खळबळजनक: तळोद्यात यार्डाबाहेर शेतमाल खरेदी केल्यास व्यापाऱ्यांना ११ हजारांचा फटका!

## आमदार राजेश पाडवींचा कडक इशारा; शेतकऱ्यांची फसवणूक थांबवण्यासाठी बाजार समितीचा ऐतिहासिक निर्णय

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

तळोदा तालुक्यातील शेतकरी बांधवांची लूट थांबवण्यासाठी आणि बाजार समितीच्या व्यवहारात पारदर्शकता आणण्यासाठी प्रशासनाने आता कडक पवित्रा घेण्याचे ठरवले आहे.बाजार समितीचे सभापती आमदार राजेश पाडवी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत, मार्केट यार्डाबाहेर अवैधपणे शेतमाल खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यांवर ११,००० रुपयांचा दंड ठोठावण्याचा धाडसी निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे अवैध खरेदी करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.गेल्या काही काळापासून अनेक व्यापारी मार्केट यार्डाच्या बाहेर, अनधिकृतपणे शेतमाल खरेदी करत असल्याच्या तक्रारी येत होत्या. यामुळे बाजार समितीचा महसूल तर बुडत होताच, पण शेतकऱ्यांचीही




मोठ्या प्रमाणावर फसवणूक होत होती. यावर चाप बसवण्यासाठी दि. २८ फेब्रुवारी रोजी संचालक मंडळ आणि व्यापारी यांची संयुक्त सभा पार पडली. या सभेत सर्वानुमते ठरविण्यात आले की, यार्डाबाहेर खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यांना आता सोडले जाणार नाही.आमदार राजेश पाडवी यांनी तालुक्यातील शेतकरी बांधवांना थेट आवाहन केले आहे की, त्यांनी आपला घाम गाळून पिकवलेला शेतमाल केवळ बाजार समितीच्या आवारातच विकावा. बाहेर माल विकल्यास जबाबदारी कोणाची? जर एखाद्या शेतकऱ्याने यार्डाबाहेर अनधिकृत व्यापाऱ्याला माल विकला, तर त्या व्यवहाराची कोणतीही जबाबदारी बाजार समिती घेणार नाही.फसवणूक टाळण्यासाठी माल विकल्यानंतर अधिकृत व्यापाऱ्याकडून बाजार समितीचे 'पक्के बिल' आणि 'चुकवती' घेण्याचे बंधनकारक करण्यात आले आहे.बाजार समितीच्या या निर्णयामुळे आता शेतकऱ्यांना हक्काचे संरक्षण मिळणार आहे. व्यापाऱ्यांनी नियमांचे उल्लंघन केल्यास त्यांच्यावर थेट दंडात्मक कारवाईची कुऱ्हाड कोसळणार आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी उचललेले हे पाऊल तालुक्यात चर्चेचा विषय ठरत असून, यामुळे 'मध्यस्थांची' मनमानी संपुष्टात येण्याची शक्यता आहे.शेतकऱ्यांच्या घामाला दाम आणि संरक्षण मिळणे हा त्यांचा अधिकार आहे. नियम मोडणाऱ्यांची गय केली जाणार नाही. असे कृषी उत्पन्न बाजार समिती, तळोदा प्रशासनाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

# पदोन्नत मुख्याध्यापक काशिनाथ राठोड यांना सेवानिवृत्तीपर निरोप



दैनिक वादळ वार्ता

**मुखेड । प्रतिनिधी**

जि.प.कें.प्रा.शा.गोणार येथील पदोन्नत मुख्याध्यापक काशिनाथ बाबुराव राठोड हे नियत वयोमानाप्रमाणे सेवानिवृत झाल्याबद्दल त्यांचा यथोचित सत्कार करुन निरोप देण्यात आला.या कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती.

कार्यक्रमास मुखेड-कंधार विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ.तुषार राठोड,लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष राहुल भैया केंद्रे,कंधार पंचायत समितीचे गटशिक्षण अधिकारी वसंत मेटकर,शिक्षक नेते शिवाजी साखरे,शिक्षक संघटनेचे राज्याध्यक्ष युवराज पोवाडे,अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघटनेचे राज्य संयुक्तचिटणीस दिलीपराव देवकांबळे,राज्य पुरस्कारप्राप्त मुख्याध्यापक जी. सी.चव्हाण,राज्य पुरस्कारप्राप्त शिक्षक डॉ.शिवाजी कराळे, तसेच विविध शिक्षक संघटनांचे पदाधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती.याप्रसंगी मान्यवरांनी मनोगतातून राठोड यांनी शिक्षण क्षेत्रात दिलेल्या योगदानाचा गौरव केला.त्यांच्या कार्यकाळात शाळेची शैक्षणिक गुणवत्ता,शिस्त व विद्यार्थ्यांप्रती असलेली बांधिलकी यांचा विशेष उल्लेख करुन सेवानिवृत्ती कार्यगोरव सोहळ्याच्या शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमास संकुल गोणार अंतर्गत सर्व मुख्याध्यापक,शिक्षक,विद्यार्थी व नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.सेवानिवृत्त मुख्याध्यापक काशिनाथ राठोड यांनी सर्व मान्यवर,सहकारी शिक्षक व उपस्थितांचे आभार मानले.

# संपादकीय

## भविष्यवेधी संकल्प

कोणत्याही राज्याचा अर्थसंकल्प म्हणजे मुद्दलात 'जमा-खर्चाचा वार्षिक ताळेबंद'च असतो. पण, राज्याच्या उत्पन्नाचे स्त्रोत काय आहेत आणि उत्पन्नाचा विनियोग राज्यकर्ते कोणत्या प्राधान्यक्रमाने करताहेत, यावरून राज्याचा इतिहास-वर्तमान आणि भविष्य अशा तीनही काळांचं स्वच्छ दर्शन होतं.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानसभेत 'समृद्ध महाराष्ट्राचा भविष्यवेधी अर्थसंकल्प' सादर केला. नव्या पिढीतील नेतृत्वाकडे राज्यांची सूत्रं गेल्यापासून साधारणतः गेल्या दहा वर्षांत देशातील अनेक राज्यांत परकीय गुंतवणुकीसाठी, केंद्राच्या योजनांमध्ये अधिक वाटा मिळवण्यासाठी, नवोद्योग आणि नवोपचारांना आकर्षित करण्यासाठी, पायाभूत सुविधांच्या विस्तारातून आपलं राज्य अधिकाधिक उद्योगस्नेही करण्यासाठी निकोप स्पर्धा सुरू आहे. या सर्व नवनेतृत्वामध्ये फडणवीस यांचा नंबर सर्वात वर आहे. त्यामुळे, महाराष्ट्रातील कारभाराकडे, इथल्या योजना आणि त्यासाठीच्या विविध तरतुदींकडे इतर राज्यांचं बारकाईने लक्ष असतं. त्या सर्व विकासेच्छु नवनेतृत्वाने अनुकरण करावं, असाच महाराष्ट्राचा यंदाचा अर्थसंकल्प आहे, यात वाद नाही. फडणवीस यांच्या दूरदृष्टीचा, सम्यक विचारांचा आणि विकासशील नीतीचा प्रत्यय त्यातील वाक्या-वाक्यातून येतो आहे. कोणत्याही राज्याचा अर्थसंकल्प म्हणजे मुद्दलात 'जमा-खर्चाचा वार्षिक ताळेबंद'च असतो. पण, राज्याच्या उत्पन्नाचे स्त्रोत काय आहेत आणि उत्पन्नाचा विनियोग राज्यकर्ते कोणत्या प्राधान्यक्रमाने करताहेत, यावरून राज्याचा इतिहास-वर्तमान आणि भविष्य अशा तीनही काळांचं स्वच्छ दर्शन होतं. सामाजिक व्यवहाराच्या प्रत्येक क्षेत्राचा विचार करून, त्यातल्या बाबींवर भरघोस तरतुदी करूनही राजकोषीय तूट स्थूल उत्पन्नाच्या तीन टक्क्यांच्या आत ठेवण्याचं कौशल्य अर्थसंकल्पात साधलं आहे, हे विशेष. देशातली सगळीच राज्यं कर्जांच्या ओझ्याखाली वाकत चालली आहेत. वाढतं शहरीकरण, या शहरांना सुविधा पुरवण्याचा ताण, अस्थिर राजकारण आणि त्यामुळे करावा लागणारा मतदाराचा अधिकाधिक अनुनय, त्यातून आलेल्या 'फुकट वाटप योजना' आणि कर आकारणीचं केंद्रीकरण, यांमुळे राज्य कात्रीत सापडली आहेत. महाराष्ट्र यात वेगळा नाही. तरीही यावेळचा अर्थसंकल्प सर्वंकष वाटतो आहे, तो फडणवीस यांच्या धाडस आणि आत्मविश्वासामुळे. वातावरणीय बदल, पर्यावरणाचं रक्षण, सार्वजनिक स्वच्छता, नैसर्गिक संसाधनांचे कार्यक्षम व्यवस्थापन आणि किफायती वापर, अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराला प्रोत्साहन, त्यासाठी तंत्रशिक्षणाचा प्रसार, सर्वांसाठी आरोग्य आणि रोजगाराच्या पुरेशा संधी हे आजच्या 'जेन-झीं'चे जिव्हाळ्याचे मुद्दे आहेत. अर्थसंकल्पाने या सगळ्याच क्षेत्रांना योग्यरीत्या न्याय दिला असून त्यातून राज्याची भविष्याची दिशाही स्पष्ट केली आहे. राज्यासाठी आणि राज्यातील जनतेसाठी अत्यंत दिलासादायक अर्थसंकल्प म्हणून या अर्थसंकल्पाची नोंद करावी लागेल.

महाराष्ट्र हे देशातील विकसित राज्य आहे. विकसित राज्यासमोरही अनेक आव्हानं असतात. मागास राज्यांची थोडीशी प्रगतीही आकड्यांमध्ये, टक्केवारीत मोठी दिसते. विकसित राज्यांचं तसं नसतं. एका विशिष्ट स्थितीला पोहोचल्यानंतर त्यानंतरची प्रगती आकड्यांमध्ये धीम्या गतीनेच पुढे सरकताना दिसते. विकसित राज्यातील जनतेच्या आकांक्षाही विकसितच असतात! त्या आकांक्षांना पुरं पडण्यासाठी करावी लागणारी गुंतवणूक, नावीन्यपूर्ण कल्पनांचे प्रयोग राबवण्यासाठी घ्यावी लागणारी जोखीम सोपी नसते. राज्य प्रगतीच्या वरच्या टप्प्यावर पोहोचल्यानंतर राज्यकर्त्यांसमोर उभी राहणारी आव्हानंही त्याच उंचीची असतात. कालच्या अर्थसंकल्पात या आव्हानांची जाणीव पदोपदी दिसते आहे. देशातलं प्रगत राज्य शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्येही गेली काही वर्षं आघाडीवर आहे. परस्परविरोधी; पण हे सत्य आहे. हा विरोधाभास संपवण्याच्या दिशेने आणखी एक पाऊल म्हणून या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांना जाहीर केलेली कर्जमाफी निश्चितच दिलासादायक ठरू शकते. एकूण कर्जातला दोन लाखांचा वाटा सरकारने उचलला, तरी बऱ्याच शेतकऱ्यांना त्यातून पुढच्या प्रयत्नांसाठी दिलासा मिळू शकतो. अशी कर्जमाफी यापूर्वी झाली नाही, असं नाही. त्या प्रत्येक वेळी तात्कालिक दिलासाही मिळाला. तो आवश्यक असला, तरी त्याने समस्या संपली नाही. पशुपालन, मत्स्यव्यवसायाची जोड हेच शेतीतल्या समस्यांना अधिक शाश्वत उत्तर आहे. 'प्राकृतिक शेती अभियान', 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजक योजना', आणि 'मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजना' समस्येवरचा दीर्घकालीन आणि शाश्वत उपाय ठरू शकतात. महाराष्ट्राच्या कृषी अर्थव्यवस्थेसाठी आवश्यक वीज, पाणी आणि अर्थ पुरवठा या तिन्हींचाही अर्थसंकल्पात साकल्याने केलेला विचार ग्रामीण महाराष्ट्रात नवचैतन्य आणल्याशिवाय राहणार नाही.परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यात महाराष्ट्र हे देशातलं पहिल्या क्रमांकाचं राज्य आहे. हल्ली असा एकही आठवडा जात नाही, जेव्हा कोणत्या ना कोणत्या राष्ट्राचा प्रमुख किंवा औद्योगिक शिष्टमंडळ मुंबई भेटीवर नसतं. फडणवीस यांनी या आघाडीवर राज्याची आघाडी कायम ठेवली आहेच; पण अशा गुंतवणूकदारांना अधिकाधिक संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी पायाभूत विकासासाठी केलेल्या तरतुदी अधिक आश्वासक आहेत. राज्यात आठ ते दहा 'एज्युसिटी' विकसित करण्याची, महामुंबईत नवी झोपडी उभी राहू नये यासाठी 'नो न्यू स्लम फ्रेमवर्क', मुंबई आणि परिसरातील वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून भुयारी मार्गांचं जाळं, समृद्धी महामार्गाला मालवाहतूक कॉरिडॉरची जोड, 'महाराष्ट्र आरोग्य सार्वजनिक संस्थे'ची स्थापना किंवा कर्करोग, मधुमेह, हृदयरुग्णांच्या निदानासाठी ग्रामीण महाराष्ट्रात ४ हजार ५०० कोटी रुपयांचा निधी ह्या या अर्थसंकल्पातील विचारांची खोली दर्शवणाऱ्या बाबी आहेत. राज्याच्या विकासाच्या अंगोपांगांचा विचार करून काळाची पावलं आणि गती ओळखून तयार केलेला हा अर्थसंकल्प म्हणूनच कौतुकास्पद आहे. महात्मा फुले यांचं २०० वं जयंती वर्ष आणि संत गाडगेबाबांचं १५०वं जयंती वर्ष साधून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मरणासह हे वर्ष 'सामाजिक समता आणि समरसता वर्ष' म्हणून साजरं करण्याची कल्पना मांडून महायुतीने आपल्या सर्वसमावेशक विकासरथावर सामाजिक न्यायाचं जे निशाण फडकावलं आहे, ते सर्वार्थसूचक आहे!

# केज नगरपंचायत 'घरकुल' निधीत ३.६२ कोटींचा झोल दोषींवर फौजदारी कारवाईसह व्याजासह वसुली होणार!

## राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांची विधानसभेत घोषणा; गरज भासल्यास 'एसआयटी' चौकशीचेही दिले संकेत

दैनिक वादळ वार्ता
**प्रकाश मुंडे । केज**

बीड जिल्ह्यातील केज नगरपंचायतीमध्ये प्रधानमंत्री आवास योजनेच्या निधीत झालेल्या ३.६२ कोटी रुपयांच्या कथित गैरव्यवहार प्रकरणी राज्य सरकारने कठोर पवित्रा घेतला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी अधिकारी , ठेकेदार आणि कर्मचाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतील, तसेच अपहार केलेली रक्कम व्याजासह वसूल केली जाईल, अशी ग्वाही नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी विधानसभेत दिली. आमदार नमिता अक्षय मुंदडा यांनी यासंदर्भात लक्षवेधी सूचना मांडली होती. त्यावर उत्तर देताना मिसाळ यांनी ही माहिती दिली.

नेमके प्रकरण काय?

केज नगरपंचायतीत प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत (शहरी) ३७४ लाभार्थ्यांना मंजुरी देण्यात आली होती. यासाठी:

केंद्र सरकारचा निधी: २ कोटी २४ लाख ४० हजार रुपये

राज्य सरकारचा निधी: ३ कोटी ६२ लाख रुपये

एकूण प्राप्त निधी: ५ कोटी ८६ लाख ४० हजार रुपये

नियमानुसार हा निधी राष्ट्रीयीकृत बँकेत जमा करणे बंधनकारक असताना, तो महाराष्ट्र ग्रामीण बँकेत जमा करण्यात आला. यापैकी ११६ लाभार्थ्यांना १ कोटी ६७ लाख ७५ हजार रुपये वितरित झाले, मात्र उर्वरित ४ कोटी २८ लाख २५ हजार रुपयांचा लाभार्थ्यांना पत्ताच नाही. हा निधी इतरत्र वळवण्यात आल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

आर्थिक गुन्हे शाखेकडून तपास; 'एसआयटी'चाही विचार

राज्यमंत्री मिसाळ यांनी सांगितले की, या व्यवहाराशी संबंधित कोणतेही लेखे (Accounts), व्हाउचर्स किंवा स्पष्ट बँक स्टेटमेंट उपलब्ध नाहीत, ही गंभीर बाब आहे.

विभागीय चौकशी: या प्रकरणाची विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे.

EOW तपास: आर्थिक गुन्हे शाखेच्या (Economic Offences Wing) माध्यमातूनही याचा तपास केला जाईल.

SIT ची शक्यता: प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता, गरज भासल्यास विशेष तपास पथक (SIT) नेमण्याचा विचार सरकार करेल.

गरिबांच्या घरांसाठी असलेल्या पैशांवर डल्ला मारणाऱ्यांना सोडले जाणार नाही. जिल्हाधिकाऱ्यांनी समिती गठीत केली असून येत्या आठ दिवसात अहवाल येताच कडक कारवाई केली जाईल.
- माधुरी मिसाळ, नगरविकास राज्यमंत्री

या चर्चेत आमदार सुधीर मुनगंटीवार आणि हरिष पिंपळे यांनीही सहभाग घेऊन प्रशासकीय अनागोंदीवर ताशेरे ओढले.

# आयुष्मान भारत डिजिटल मिशनमध्ये अलिबाग जिल्हा रुग्णालयाची राज्यात दुसरी कामगिरी महाआरोग्य व आरोग्य रत्न पुरस्काराने गौरव



दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

आयुष्मान भारत डिजिटल मिशन अंतर्गत ई-सुश्रुत प्रणालीची प्रभावी अंमलबजावणी करत अलिबाग जिल्हा रुग्णालयाने राज्यात दुसरा क्रमांक मिळवत उल्लेखनीय कामगिरी नोंदवली आहे. या उपक्रमामुळे रुग्णसेवा अधिक वेगवान, पारदर्शक आणि कार्यक्षम झाली आहे.जानेवारी २०२६ महिन्यात रुग्णालयात ६ हजारांहून अधिक टोकन जनरेट करण्यात आले असून त्यापैकी ३ हजारांहून अधिक हेल्थ रेकॉर्डचे लिंकेज ऑनलाइन ओपीडीद्वारे करण्यात आले आहे. रुग्णालयातील सर्व १६ विभागांचे कामकाज ई-सुश्रुत प्रणालीद्वारे पूर्णपणे डिजिटल करण्यात आले असून रुग्ण नोंदणी, तपासणी, उपचार व संदर्भ प्रक्रिया अधिक सुलभ झाली आहे.या उल्लेखनीय कार्याची दखल घेत मा. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री श्री. प्रकाशजी आबिटकर तसेच सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री श्रीमती मेघना बोर्डीकर यांच्या हस्ते अलिबाग जिल्हा रुग्णालयाला वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्य रत्न पुरस्कार आणि महाआरोग्य पुरस्कार २०२६ प्रदान करून सन्मानित करण्यात आले.यावेळी ठाणे सर्कलचे उपसंचालक डॉ. अशोक नांदापूरकर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निशिकांत पाटील, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. शीतल जोशी, मेट्रन गायत्री म्हात्रे, मालती मोकल, स्मिता जोशी, फॅसिलिटी मॅनेजर आयेशा नवसीन पटेल तसेच सिव्हिल हॉस्पिटलचे कर्मचारी उपस्थित होते.

# भरत बुधाजी पाटील यांची सहाव्यांदा रास्त भाव धान्य दुकान व किरकोळ रॉकेल विक्रेते वेलफेअर असोसिएशन पनवेलच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

रास्त भाव धान्य दुकान व किरकोळ रॉकेल विक्रेते वेलफेअर असोसिएशन पनवेल संघटनेच्या दिनांक २८/१०/२०२५ रोजीच्या ठराव क्रमांक ३ नुसार निवड दिनांक ०१/११/२०२५ ते दिनांक ३१/१०/२०३० या कालावधीसाठी करण्यात आलेली आहे, पनवेल तालुक्यातील दुकानदारांची संघटनेत सर्व पक्षाचे काम करणारे दुकानदार, पदाधिकारी व कार्यकर्ते आहेत, सर्व पक्षाचे दुकानदार,पदाधिकारी,कार्यकर्ते यांच्या संघटनेची एकत्रित स्थापना झाल्यापासून भरत पाटील हे सतत ३० वर्षे संघटनेच्या अध्यक्ष पदावर कार्यरत आहेत, त्यांचे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व आर्थिक कार्यात मोठे योगदान आहे मा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, रायगड विभाग, रायगड अलिबाग याच्या कार्यालयात नोंदणी करण्यात आलेली असून सन २०२५ ते २०३० पर्यंत खालील सदस्यांची निवड करण्यात आलेली आहे

१) श्री भरत बुधाजी पाटील- अध्यक्ष
२) श्री शशिकांत शनिवार शेलके- उपाध्यक्ष
३) श्री भालचंद्र गणपत पगडे- सेक्रेटरी



४) श्री केसरीनाथ विनायक पाटील- सह सेक्रेटरी
५) श्री नंदकुमार दामोदर पाटील-खजिनदार
६) श्री अनिल उर्फ बाबू लक्ष्मण जाधव
७) श्री कृष्णा महादेव भेंडे यांच्यासह एकूण २७ सदस्यांची सन २०२५ ते सन २०३० कालावधी करीता बिनविरोध (एकमताने) निवड करण्यात आलेली आहे.

# राज्याचा आर्थिक पाहणी अहवाल सादर-अर्थव्यवस्थेत ७.९ टक्के वाढ अपेक्षित दरडोई उत्पन्न ३.४७ लाखांवर

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

राज्याची अर्थव्यवस्था देशातील सर्वात मजबूत आणि गतिशील अर्थव्यवस्थांपैकी एक असून या आर्थिक वर्षात ती ७.९ टक्क्यांनी वाढेल, असा अंदाज ' राज्याच्या आर्थिक पाहणी (२०२५-२६) अहवालात व्यक्त करण्यात आला आहे. कृषी, उद्योग आणि सेवा क्षेत्रातील संतुलित वाढ, पायाभूत सुविधांमधील मोठी गुंतवणूक आणि व्यवसाय सुलभतेसाठी केलेल्या सुधारणा यामुळे राज्याची आर्थिक स्पर्धात्मकता अधिक बळकट झाल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.आर्थिक पाहणी २०२५-२६ अहवाल विधानसभेत वित्त व नियोजन राज्यमंत्री ड.आशिष जयस्वाल तर विधानपरिषदेत राज्यमंत्री पंकज भोयर यांनी सादर केला. या अहवालानूसार २०२५-२६ या वर्षात राज्याचे सांकेतिक स्थूल राज्य उत्पन्न ५१,००,५९७ कोटी रुपये इतके अपेक्षित आहे, तर वास्तविक स्थूल राज्य उत्पन्न २८,८२,६९९ कोटी रुपये इतके राहण्याचा अंदाज आहे. तसेच राज्याचे दरडोई उत्पन्न ३,४७,९०३ रुपये इतके अपेक्षित असून ते भारताच्या दरडोई उत्पन्नाच्या (२,१९,५७५ रुपये) तुलनेत लक्षणीय अधिक आहे.देशाच्या जीडीपीत महाराष्ट्राचा सर्वाधिक वाटा - पहिल्या सुधारित अंदाजानुसार २०२४-२५ मध्ये देशाच्या सांकेतिक स्थूल देशांतर्गत उत्पन्नात महाराष्ट्राचा वाटा १४ टक्के असून तो देशातील सर्वाधिक आहे. विकासकामी सर्व क्षेत्रात झालेल्या गुंतवणुकीमुळे पायाभूत सुविधांचा विकास वेगाने होत असल्याचे अहवालात नमूद केले आहे.क्षेत्रनिहाय वाढीचा अंदाज - सन २०२५-२६ मध्ये विविध क्षेत्रांत वाढ अपेक्षित आहे. यामध्ये कृषी व संलग्न कार्ये यात ३.४ टक्के वाढ अपेक्षित आहे तर उद्योग क्षेत्रात ५.७ टक्के आणि सेवा क्षेत्रात ९.० टक्के वाढ अपेक्षित असून सेवा क्षेत्रातील वेगवान वाढ राज्याच्या अर्थव्यवस्थेला मोठा आधार देत असल्याचे अहवालात स्पष्ट केले आहे.चलनवाढ नियंत्रणात - एप्रिल ते डिसेंबर २०२५ या कालावधीत ग्रामीण भागातील सरासरी ग्राहक किंमत निर्देशांक ४०१.८ तर नागरी भागातील ३७६.७ होता. या कालावधीत ग्रामीण भागात २.० टक्के आणि नागरी भागात १.५ टक्के चलनवाढ नोंदविण्यात आली. जीवनावश्यक वस्तूंवरील जीएसटी दरातील सुधारणांमुळे किमतींवर सकारात्मक परिणाम झाल्याचेही अहवालात नमूद करण्यात आले आहे.सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा विस्तार - डिसेंबर २०२५ पर्यंत राज्यात २७०.८४ लाख शिधापत्रिका धारक असून ५१,६३६ रास्त भाव दुकाने कार्यरत आहेत.सामाजिक क्षेत्रात सामाजिक विकासाच्या दृष्टीनेही राज्याने प्रगती केली आहे. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत नागरी भागात ८.७५ लाख आणि ग्रामीण भागात १६.०५ लाख घरे पूर्ण झाली आहेत. जल जीवन अभियानामुळे ९० टक्क्यांहून अधिक कुटुंबांना नळजोडणी उपलब्ध झाली आहे. राज्यातील ४०,२४७ गावांपैकी ३४,५८४ गावांना स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) अंतर्गत ओडीएफ+ घोषित केले आहे. तर नागरी अंतर्गत माहे डिसेंबर २०२५ पर्यंत ४२ शहरे ओडीएफ, ८२ शहरे ओडीएफ+ , २५७ शहरे ओडीएफ++ आणि ३० शहरे वॉटर+ म्हणून घोषित करण्यात आली.राज्याची महसुली स्थिती - अर्थसंकल्पीय अंदाजानुसार सन २०२५-२६ मध्ये राज्याची महसुली जमा ५,६०,९६४ कोटी रुपये अपेक्षित आहे. यापैकी ४,७७,४०० कोटी रुपये कर महसूल आणि ३३,०५२ कोटी रुपये करेतर महसूल अपेक्षित आहे.राज्याने गेल्या दशकात राजकोषीय तूट स्थूल राज्य उत्पन्नाच्या ३ टक्क्यांच्या मर्यादेत ठेवण्याचा प्रयत्न कायम ठेवला आहे. २०२५-२६ मध्ये ती २.७ टक्के राहण्याचा अंदाज आहे.राज्यातील शेतकऱ्यांना अवकाळी पाऊस व अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीपोटी ११६.४० लाख शेतकऱ्यांना ९४.८२ लाख हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ९,०२२.३८ कोटी रुपयांची नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली. सौर कृषी पंप योजनेंतर्गत माहे डिसेंबर २०२५ अखेर राज्यात ७.३७ लाख सौर पंप बसविण्यात आले आहेत. ३१ मार्च २०२५ रोजी राज्यातील वीज निर्मितीची स्थापित क्षमता ४१,०१९ मेगावॅट होती. नवीकरणीय ऊर्जेची क्षमता वाढत असून राज्य देशात तिसऱ्या क्रमांकावर आहे. सौर ऊर्जेच्या क्षमतेत गेल्या काही वर्षांत मोठी वाढ झाली आहे.

# सातपुड्याच्या पायथ्याशी 'गेर नृत्याचा' गजर सोजदान येथे १८९ वर्षांची परंपरा उत्साहात साजरी

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

नंदुरबार जिल्ह्यातील सातपुड्याच्या पर्वत रांगांमध्ये वसलेल्या अक्कलकुवा तालुक्यातील सोजदान येथे आदिम संस्कृतीचे दर्शन घडवणारा पारंपरिक 'गेर नृत्य' (दिंडन नृत्य) सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. धुलिवंदनाच्या मुहूर्तावर या नृत्याचा शुभारंभ झाला असून, सातपुड्याच्या पायथ्याशी हजारो भाविकांच्या उपस्थितीने एक भावपूर्ण आणि भक्तीमय वातावरण निर्माण झाले आहे.अक्कलकुवा तालुक्यातील नवलपूर संस्थानिकांनी सन १८३४-१८३५ पासून हे गेर नृत्य सुरू केले आहे. ही प्राचीन परंपरा संस्थानिकांचे वंशज कुवरसिंह तापसिंह पाडवी व जगतसिंग गटवरसिंग पाडवी यांनी जपली असून, आजही ही परंपरा तितक्याच निष्ठेने पुढे सुरू आहे. या नृत्याचे वैशिष्ट्य म्हणजे हे दरवर्षी न होता, मध्ये एक वर्षाचा खंड देऊन पुढील वर्षी आयोजित केले जाते.

**कठोर व्रत आणि अनवाणी नृत्य:**-हे पारंपरिक नृत्य सुरू होण्यापूर्वी शेकडो भाविकांनी अत्यंत कठोर व्रत केले आहे. रणरणत्या उन्हात, अनवाणी पायाने आणि पारंपरिक वेशभूषेत बासरीच्या (पावी) तालावर केले जाणारे हे नृत्य पाहण्यासारखे असते. विशेष म्हणजे, या नृत्यात सहभागी होणारी मुले ही मुलींच्या पारंपरिक वेशभूषेत सहभागी होतात, जे या उत्सवाचे मुख्य आकर्षण ठरते. यंदाच्या उत्सवासाठी गेल्या अनेक दिवसांपासून तयारी सुरू होती.१९ फेब्रुवारी २०२६: गिंब देवाचे विधिवत पूजन करण्यात आले .२१ फेब्रुवारी २०२६: गादीची स्थापना होऊन सराव सुरू झाला. १ मार्च २०२६: नृत्याचा सराव पूर्ण करून धुलिवंदनाच्या दिवशी मुख्य सोहळ्याला सुरुवात झाली. या सांस्कृतिक सोहळ्यास खासदार ड. गोवाल पाडवी, आमदार आमश्या पाडवी, माजी मंत्री ड. के. सी. पाडवी, ड. पद्माकर वळवी, माजी जि.प. सभापती सुहास नाईक, जि.प. सदस्य जितेंद्र पाडवी यांच्यासह जिल्ह्यातील अनेक मान्यवरांनी भेटी देऊन या परंपरेचे कौतुक केले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्य आयोजक गणपतसिंग जवरसिंग पाडवी, अरुणसिंग सुरेंद्रसिंग पाडवी, प्रेमसिंग सुमेरसिंग पाडवी यांच्यासह भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष नागेश पाडवी, सरपंच भूपेंद्र पाडवी व परिसरातील पोलीस पाटलांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी मुख्य पुजारी संमिश्रा जेरमा वरती, विजयसिंग मांगा वळवी यांच्या मार्गदर्शनाखाली मोरखी जयसिंग खात्या पाडवी, नृत्य प्रशिक्षक जेमू नुरज्या पाडवी, नगारा वादक रामसिंग पाडवी, बासरी वादक निलेश वळवी, मांदल वादक जगन पाडवी आणि ताट वादक रवींद्र पाडवी यांनी आपल्या कलेने सोहळ्यात रंगत आणली.



# बनावट कागदपत्राच्या आधारे शिक्षक समायोजन


## मुख्याध्यापक शिक्षकाविरुद्ध न्यायालयाच्या आदेशाने गुन्हा दाखल

**दैनिक वादळ वार्ता**
**औसा । प्रतिनिधी**

औसा तालुक्यातील खरोसा नवभारत उच्च माध्यमिक विद्यालय बनावट कागदपत्राच्या आधारे शिक्षक समायोजन केल्याचा प्रकार समोर आला आहे, न्यायालयाच्या आदेशावरून मुख्याध्यापक व संबंधित शिक्षकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे

या शाळेचे मुख्याध्यापक परमेश्वर पंचाप्पा स्वामी यांनी सहशिक्षक गणेश मोतीराम बिराजदार यांच्याशी संगणमत करून माध्यमिक शिक्षण समायोजनाचा खोटा व बनावट प्रस्ताव तयार केला शाळेतील उच्च माध्यमिक सहशिक्षक दत्तात्रय गोविंद सुरवसे हे सेवानिवृत्त झाले त्यामुळे मराठी व इतिहास विषयाची जागा रिक्त झाली होती परंतु हिंदी व इतिहास विषयाची अर्हता असलेल्या शिक्षकाचे समायोजन करण्यात आले यासाठी शालेय समितीची बैठक झाली नाही कार्यवाही पुस्तिकेत नोंद नसतानाही खोटा ठराव तयार करण्यात आला प्रस्तावासोबत जोडलेली कार्यकारी मंडळ व शालेय समितीची यादी ही बनावट असल्याचा आरोप आहे या यादीत संस्थेचे सभासद नसलेल्या व्यक्तीची नावे आहेत संबंधित शिक्षकाला थेट संस्थेच्या सहसचिव दाखवून मुख्याध्यापकाच्या शिक्कास स्वाक्षरीने प्रस्ताव पुढे रेटण्यात आला

तक्रारीनुसार संस्थेच्या सचिवांच्या बनावट शिक्का व स्वाक्षऱ्यांचा वापर करण्यात आला सेवा जेष्ठता यादीत संबंधित शिक्षकांचा क्रमांक १५ असताना वरिष्ठ शिक्षकांचे बायपास करून संगणमनाथांनी लाभ मिळवून देण्यात आला असल्याचा निदर्शनास आला आहे.



**सदर प्रकरणात याप्रकरणी संस्थेचे सचिव मल्लिकार्जुन परमेश्वर डोके यांनी पोलीस अधीक्षक व पोलीस ठाण्याकडे तक्रार करूनही तीन महिने कारवाई झाली नाही अखेर त्यांनी न्यायालयात धाव घेतली प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांनी गंभीर दखल घेत भारतीय न्याय संहितेनुसार फसवणूक बनावट कागदपत्रे तयार करणे व संगणमाथाचे गंभीर कलम लावून गुन्हा नोंदविण्याचे आदेश दिले त्यानुसार किल्लारी पोलीस ठाण्यात मुख्याध्यापक व शिक्षकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे,**

# पाचोड मध्ये दिंड्याचे आगमन परिसर दणाणला

**दैनिक वादळ वार्ता**
**पाचोड । प्रतिनिधी**

पैठण काल दि ५पासून सुरु झालेल्या नाथ षष्ठी सोहळ्यात सहभागी होण्यासाठी टाळ मृदंग खणखणाट आणि भानुदास एकनाथचा जयघोष करत ऊन वाऱ्याचे परवा न करता शेकडो किलोमीटरचे अंतर पायी कापत दिंड्याचे येण्यास सुरुवात झाली आहे पाचोड पैठण परिसर असंख्य दिंडीच्या आगमनाने दणाणला गेला असून टाळ मृदंग तसेच हातात भगवे पताका घेत एकनाथ महाराज की जय असे बोलत त्यांच्यासोबत आलेले भाविक पैठण कडे कुच करताना दिसत आहे त्यामुळे प्रति वर्षाप्रमाणे पाचोड पैठण रस्त्यावर दिंड्यात सहभागी झालेले भावीक दिसत आहे

खामगाव जालना भोकरदन अंबड घनसांगवी परतुर सिल्लोड कुंभार पिंपळगाव फुलंब्री सोयगाव आदि ठिकाणाहून येथे दिंड्या पाचोड मार्गे पैठण कडे रवाना होताना दिसत आहे त्यामुळे पाचोड पैठण रोड एकामागून



एक येणाऱ्या दिंड्यांनी फुलला असून त्यांचे ठिकठिकाणी जंगी स्वागत करण्यात येत आहे शिवाय ग्रामस्थाकांकडून त्यांच्या राहण्याच्या खाण्यापिण्याची सोय पण केली जात आहे विशेष म्हणजे अनेक दिंड्या रात्री मुक्काम ठोकत असल्याने धार्मिक कार्यक्रम पार पडत आहे त्यामुळे गावागावात भक्तीभावाचे वातावरण निर्माण झाले आहे रणरणत्या उन्हात जीवाची परवा न करता तोंडात एकनाथाचे नाव घेत अनवाणी पायाने दिंड्या मधील महिला पुरुष वृद्ध पायी चालत वाट काटत असल्याचे नजरेस पडत आहे त्यांच्या ठीक ठिकाणी नाष्ट्या पाण्याची सोय नागरिकाकडून केली जात आहे

## आमदार किर्तीकुमार उर्फ बंटी भांगडिया यांना दिले निवेदन

# चिमूर शहरात मुस्लिम बांधवासाठी सभागृह निर्माण करण्याची केली मागणी

**दैनिक वादळ वार्ता**
**चिमूर । प्रतिनिधी**

शहरातील मुस्लिम बांधवानी आमदार किर्तीकुमार उर्फ बंटी भांगडिया यांची भेट घेऊन मुस्लिम समाजाच्या कार्यक्रमासाठी सभागृह बांधकाम मंजूर करण्याची मागणी निवेदनाद्वारे केली.

मुस्लिम बांधवांकडे सभागृहाचे बांधकाम करण्यासाठी मालकी हक्काची जागा नसल्याने,जागा उपलब्ध करून द्यावी,अशी आग्रही मागणी केली.

आमदार किर्तीकुमार उर्फ बंटी भांगडिया यांनी आपल्या योग्य नियोजनातून विविध समाजासाठी सभागृहाची निर्मिती केली,त्याच धर्तीवर मुस्लिम बांधवांसाठी एक प्रशस्त सभागृह निर्माण करण्याची मागणी केली. चिमूर येथील सामाजिक कार्यकर्ता पप्पु शेख व अनेक मुस्लिम बांधवानी आमदार किर्ती कुमार उर्फ बंटी



भांगडिया यांच्याकडे सदर मागणी केली.निवेदनाची दखल घेत चिमूर विधानसभा क्षेत्राचे आमदार किर्ती कुमार उर्फ बंटी भांगडिया यांनी सुद्धा लवकरात लवकर चिमूर शहरात भरीव निधीचे प्रशस्त सभागृह मंजूर करण्याचे आश्वासन चिमूर येथील मुस्लिम बांधवांच्या शिष्टमंडळाला दिले. यामुळे चिमूर येथे मुस्लिम बांधवासाठी भव्य सभागृह निर्माण होत असल्याने चिमूर येथील समस्त मुस्लिम बांधवानी आमदार किर्ती कुमार उर्फ बंटी भांगडिया यांचे आभार व्यक्त केले आहे.

## तेरणेच्या काठावर येळनुर येथे श्री संत तुकाराम महाराजांची बीज साजरी

# निलंगा नगरीचे नवनिर्वाचीत नगराध्यक्ष संजय हलगरगर यांचा येळणुर ग्रामस्थातर्फे सत्कार संपन्न



**दैनिक वादळ वार्ता**
**जिवन । प्रतिनिधी**

निलंगा तालुक्यातील येळणुर येथे तेरणा नदीच्या तिरावर श्री संत तुकाराम महाराज यांची पारंपारीक वर्षानुवर्ष साजरी होणारी बीज आज संत तुकाराम महाराजांच्या मुर्तिवर गुलालाची उधळण करत शेकडो भाविकांच्या उपस्थीतीत बीज साजरी करण्यात आली ,निलंगा तालुक्यातील बीज ही सर्व जिल्हा वासीयांना परीचीत असलेली बीज असुन कित्येक वर्षापासुन येळणुर येथील तेरणा तिरावर असलेले श्री संत तुकाराम महाराज मंदीरात श्री च्या मुर्तीला आकर्षक सजावट करुन श्रीच्या मुर्तीवर गुलालाची उधळण करण्यात आली ,दरवर्षी येळणुर येथे तुकाराम बीज निमीत्त अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यासह किर्तन ,हरीजागर ,हरीपाठ ,काकडा ,सह सप्ताहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते ,सप्ताह काळात सात दिवस येळणुर गावात प्रति पंढरपुर व देहु आळंदी असा सोहळा आयोजीत केला जातो या सोहळ्याला येळणुर सह परीसरातील भाविक मोठ्या संख्येने येळणुर येथील संत तुकाराम महाराजांच्या बीज साजरी करतात ,येळणुर येथील ह.भ.प हरिभाउ महाराज यांच्या कृपाअशिर्वादाने येळणुर येथे बीज परंपरा सोहळा सुरु आहे व गावात मानकरी गुंडाजी वरमुडगे यांच्या घरातुन गुलालासाठी पालखी निघते व गावात पालखीची प्रदक्षीणा घालुन काल्याच्या किर्तनाने व जंगी कुस्ती कार्यक्रमाने सप्ताह यात्रेची सांगता केली जाते अशी माहीती ग्रामस्थांनी दीली ,यावेळी येळणुरचे कर्तव्यदक्ष सरपंच,रंजना नरमले ,उपसरपंच पवन शिवाजी साळुंके ,सप्ताह कमीटी अध्यक्ष ,उपाध्यक्ष व येळणुर ग्रामस्थ यावेळी उपस्थीत होते

# वादग्रस्त व्हिडिओ ग्रुपला टाकला ; पोलिसांनी डायरेक्ट येरावड्यालाच फेकला

# धार्मिक तेढ निर्माण होईल असे कृत्य करु नका : पोलीस निरीक्षक गोपाळ पवार

**दैनिक वादळ वार्ता**
**दौंड,पुणे । प्रतिनिधी**

वादग्रस्त व्हिडिओ ग्रुपला टाकणं एका तरुणाला भलतेच माहागात पडले असून दि.०४ रोजी जब्बार इस्माईल शेख वय ६२ वर्षे राहणार गांधी चौक दौंड, जि.पुणे याने त्याचे मोबाईल मधील व्हाँट्सअँप ग्रुपवर वादग्रस्त व्हिडिओ टाकून धार्मिक तेढ निर्माण होईल असे कृत्य केल्याने तात्काळ त्यांना दौंड पोलीस ठाणे येथे घेऊन त्यांचा मोबाईल फोन दोन पंचा समक्ष जप्त करून, जब्बार इस्माईल शेख यांचेवर कलम १२९ बी एन एन एस (१०८ भादवि ) प्रमाणे कारवाई करून




त्यांना विशेष दंडाधिकारी,गणेश बिरादार मा.अप्पर पोलीस अधीक्षक बारामती यांच्याकडे प्रतिबंधात्मक कारवाई करिता हजर केले असता विशेष न्यायदंडाधिकारी माननीय अप्पर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार यांनी जब्बार इस्माईल शेख यांची १५ दिवसांसाठी न्यायालयीन कोठडी मंजूर करून त्यास येरवडा कारागृह पुणे येथे रवाना केलेली आहे.

तरी दौंड पोलीस स्टेशन हद्दीमधील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,दोन समाजामध्ये तेढ निर्माण होईल,कोणाच्या धार्मिक भावना दुखावतील असे कृत्य मोबाईल व्हाँट्सअँप ग्रुपवर आक्षेपार्ह स्टेटस अगर पोस्ट टाकल्यास यापुढे संबंधित इसमांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल अशी माहिती दौंड पोलीस निरीक्षक गोपाळ पवार यांनी दिली

# पाटोदा सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीचा अभिनव उपक्रम : सहभागी शाळांना ३२ इंची एलईडी टीव्ही भेट

**दैनिक वादळ वार्ता**
**पाटोदा । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या विविध सांस्कृतिक व शैक्षणिक कार्यक्रमांमध्ये परिसरातील अनेक शाळांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला होता. विद्यार्थ्यांमध्ये शिवचरित्राबद्दल जागृती व्हावी, तसेच त्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे या उद्देशाने या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमांमध्ये एकूण १३ शाळांनी सहभाग घेतला होता. सहभागी झालेल्या सर्व शाळांचा उत्साह वाढवण्यासाठी आणि त्यांच्या योगदानाची दखल घेण्यासाठी शिवजयंती उत्सव समितीने अभिनव उपक्रम राबवत प्रत्येक शाळेला ३२ इंची एलईडी टीव्ही बक्षीस स्वरूपात देण्याचा निर्णय घेतला.समितीच्या पदाधिकाऱ्यांनी स्वतः संबंधित शाळांना भेट देत या टीव्हींचे वितरण



केले. या उपक्रमामुळे शाळांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विद्यार्थ्यांना शैक्षणिक व्हिडिओ, डिजिटल शिक्षण तसेच विविध माहितीपर कार्यक्रम पाहण्यासाठी आधुनिक साधन उपलब्ध झाले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला निश्चितच चालना मिळणार असल्याचे शिक्षकांनी सांगितले.शिवजयंती उत्सव केवळ साजरा न करता त्यातून समाजोपयोगी उपक्रम राबवण्याचा समितीचा हा प्रयत्न सर्व स्तरातून कौतुकास्पद ठरत आहे.सहभागी सर्व १३ शाळांच्या मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थ्यांनी सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीचे मनापासून आभार व्यक्त केले असून भविष्यातही अशा उपयुक्त उपक्रमांचे आयोजन करण्यात यावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

# पैठणच्या आतील नाथ मंदिरात फाग उत्सव मोठया उत्सवात साजरा

## दहा क्विंटल गुलाल फुलांची उधळण

**दैनिक वादळ वार्ता**
**पाचोड । प्रतिनिधी**

संत एकनाथ महाराज यांच्या राहत्या वाड्यात (आतील नाथ मंदिरात) धुलीवंदना निमित्त मंगळवारी दिनांक ३ फाग उत्सव साजरा करण्यात आला यानिमित्त रंग ऐवजी दहा क्विंटल गुलाबाच्या फुलांच्या पाकळ्यांची उधळण करत पर्यावरण पूरक धुलीवंदन साजरी करण्यात आली अमीर गुलाल उधळीत रंग नाथा घरी नाचे माझा सखा पांडुरंग या सुरेल अभंगाच्या तालावर नाथ महाराज मंदिर परिसर भक्ती भावाने न्हावून निघाला या फाग उत्सवासाठी इंदूर जालना द्वारका नाथद्वारा जगन्नाथ पुरी वृंदावन तिरुपती बालाजी मंदिर कोल्हापूर तसेच कांची




कामकोटी पीठ येथून आणलेला हा गुलाल भाविकांच्या अंगावर उधळण्यात आला यंदाच्या फाग उत्सवात जवळपास दहा क्विंटल फुलांचा वापर करण्यात आला असल्याची माहिती गोवत्स परिवार च्या वतीने देण्यात आली गत आठ वर्षांपासून हा फाग उत्सव गोवत्स परिवार तर्फे सातत्याने साजरा केला आहे शालिवाहन परिवाराची दरवर्षी भक्ती सेवा लाभत असल्याचेही सांगण्यात आले. या उत्सवात मिलिंद महाराज गोसावी गणेश लोहिया पुष्कर महाराज गोसावी पवन रोहिया बलराम लोळगे हरी पंडित गोसावी संजय सारडा जुगल किशोर लोहिया शिवाजीराव गोडसे आनंद लोहिया सुनील हिंगे शिवराज पारिख आतिश बारे उमेश बाहेती लालू सराफ आदींनी सहभाग घेतला

# संतकवी सर्वज्ञ दासोपंत समाधी परिसरातील वाढते गैरप्रकार बंद करून पवित्र वास्तुचे संरक्षण करा-उपजिल्हाधिकारी यांना निवेदन

दैनिक वादळ वार्ता
**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

मराठीतील श्रेष्ठ संतकवी पासोडीकार सर्वज्ञ दासोपंत यांची समाधी अंबाजोगाई शहराबाहेर आद्यकवी मुकूंदराज समाधी रस्त्यालगत असून या समाधी परिसरात मद्यप्राशन, अस्वच्छता,तोडफोड व नासधूस यांसारखे गैरप्रकार सारखेच घडत असल्याने या पवित्र स्थळाची हानी होत आहे. हे होत असलेले गैरप्रकार रोखून या भागाचे संरक्षण तसेच वीजेची व्यवस्था करावी या मागणीचे निवेदन दासोपंत संशोधन मंडळ, श्रीदत्त संस्थान धाकटे देवघर व शहरातील भक्त भाविकांच्या वतीने गुरुवार दि.५ मार्च रोजी उपजिल्हाधिकारी कार्यालयात देण्यात आले दिलेल्या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की,संतकवी सर्वज्ञ दासोपंत समाधी परिसरात प्रकाश योजना नाही त्यामुळे गैर प्रकारांना वाव मिळत आहे.त्या अनुषंगाने पोलिस कंट्रोल रूमशी संलग्न सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्यात यावेत.संपूर्ण परिसरा भोवती संरक्षक भिंत उभारून वाढत्या अतिक्रमणास प्रतिबंध करावा नियमित पोलिस गस्त वाढवावी.स्थानिक प्रशासनाने स्वच्छता व देखभाल करावी,सर्वज्ञ दासोपंत समाधी स्थळ



हे पवित्र स्थान असल्यामुळे त्याचे जतन व संरक्षण करावे त्याच बरोबर जवळच असलेल्या नृसिंहतीर्थ स्मशानभुमीत ही स्वच्छता,संरक्षक भिंत तसेच प्रखर विजेच्या दिव्यांची व्यवस्था करावी या मागणी निवेदनाच्या प्रती आ.नमिता मुंदडा, अप्पर पोलीस अधीक्षक, बीड,तहसीलदार, अंबाजोगाई, मुख्याधिकारी,नगर परिषद,मा.नगराध्यक्ष, अंबाजोगाई यांना देण्यात आल्या असून निवेदनावर दिगंबर गोस्वामी अड. मकरंद पत्की,श्रेयस गोस्वामी,डॉ.प्रज्वल देशपांडे,लक्ष्मीकांत गोस्वामी,अविनाश जोशी,राहूल देशपांडे, डॉ.सुधीर धर्मपात्रे, ए.पी.देशपांडे,पद्माकर कुलकर्णी,मकरंद सोनेसांगवीकर,अड. राघवेंद्र,देशपांडे,अड. डी.पी.रांदड,प्रतीक पुसरेकर,अड.अमर देशपांडे,सुश्रुत पुराणिक, संतोष देशपांडे,कृष्णा सनगावकर,गजानन देशपांडे,शशीकुमार कुर्लेकर,मंगेश गोस्वामी, भास्कर देशपांडे,शंतनू परळकर,सुमंत गोस्वामी, अमोघ कुलकर्णी, बालासाहेब मुंडे,श्रीकांत गोस्वामी,महेश आराध्ये, अविनाश अघोर,अभय जोशी,पद्माकर सेलमोकर,सागर दिक्षित, सुमित केजकर,विश्वंभर गोस्वामी आदीसह इतरांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# जागतिक महिला दिना निमित्त बीडमध्ये भव्य डान्स स्पर्धेचे आयोजन ; महिलांच्या कर्तृत्वाला सलाम

दैनिक वादळ वार्ता
**बीड | प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या संकल्पनेतून व म्हाळसा महिला प्रतिष्ठाण,बीड यांच्या वतीने नारी शक्ती – तुमच्या कर्तृत्वाला सलाम या उपक्रमांतर्गत जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून भव्य डान्स स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा दि.१५ मार्च २०२६,रविवार, सायंकाळी ४ ते रात्री १० वाजेपर्यंत हॉटेल ओलीव्ह,नगर रोड,बीड येथे होणार आहे.या स्पर्धेत महिलांना आपली कला सादर करण्याची संधी मिळणार असून स्पर्धा दोन गटांमध्ये घेण्यात येणार आहे.१० ते १७ वर्षे वयोगटातील मुलींसाठी एक गट तर १७ वर्षांपुढील सर्व महिलांसाठी स्वतंत्र गट ठेवण्यात आला आहे. या उपक्रमातूनमहिलांमधील कलागुणांना वाव देणे आणि महिला शक्तीचा सन्मान करणे हा उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.दोन्ही गटाला स्वतंत्र रोख रकमेची पारितोषिके ठेवण्यात आली आहे.स्पर्धेसाठी १७ वर्षांपुढील महिलां साठी प्रथम बक्षीस ७००० रुपये ठेवण्यात आले असून द्वितीय ५००० व तृतीय ३००० क्रमांकाच्या विजेत्यांनाही आकर्षक बक्षिसे देण्यात येणार आहेत.उत्तेजनार्थ तीन पैठणी साड्याचे बक्षीस



ठेवण्यात आले आहे.या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून मनसे नेते मा.दिलीप (बापू) धोत्रे,मनसे सर चिटणीस संतोष (भाऊ) नागरगोजे,मनसे सरचिटणीस रिटाताई गुप्ता,मनसे बीड जिल्हाध्यक्ष श्रीराम बादाडे,वक्फ बोर्ड अध्यक्ष समीर काझी, डी.वाय.एस.पी.पूजा पवार व शिक्षणाधिकारी प्रिया पाटील उपस्थित राहणार आहेत.या स्पर्धेचे आयोजन वर्षाताई जगदाळे (मनसे राज्य उपाध्यक्ष,अध्यक्ष – म्हाळसा महिला प्रतिष्ठाण,बीड) यांच्या मार्गदर्शनाखाली होत असून मयुरी बाबर (सचिव – म्हाळसा महिला प्रतिष्ठाण,बीड) या समन्वयक म्हणून काम पाहत आहेत.

स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या मुली व महिलांनी ७३८५४०८९९९, ९२८४९३७१३२, ८३०८९५५९४१, ९८२२५१३८७९ या क्रमांकांवर संपर्क साधून नाव नोंदणी करावी,असे आवाहन आयोजकांनी केले आहे.तसेच स्पर्धकांनी वेळेवर उपस्थित राहणेआवश्यक असून उशिरा आल्यास स्पर्धेतून बाद केले जाईल,अशी सूचना देण्यात आली आहे.जागतिक महिला दिना निमित्त आयोजित या सांस्कृतिक उपक्रमामुळे बीड शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून अनेक मुली व महिला या स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग घेतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# केज तालुक्यात 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर' अभियानाची सुरुवात

## एकाच दिवशी नागरिकांना महसुली सेवा मिळणार

दैनिक वादळ वार्ता
**केज | प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या वतीने नागरिकांना महसुली सेवा सुलभ, पारदर्शक व वेळेत मिळाव्यात यासाठी 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर' अभियान (टप्पा क्र.१) राबविण्यात येत असून, या अंतर्गत केज तालुका येथे विविध गावांमध्ये विशेष महसूल शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.या शिबिरांमधून नागरिकांना एकाच दिवशी (डळपसश्रश ऊ डर्शीींळलश ऊशश्रर्ळींशिू) अनेक सेवा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.शिबिरांचे वेळापत्रक सकाळी ११.०० वाजता



होळ –७ मार्च २०२६,
युसुफ वडगाव –१४ मार्च २०२६,चिंचोली माळी – १५ मार्च २०२६
मस्साजोग –१० एप्रिल २०२६,हनुमंत पिंपरी – १७ एप्रिल २०२६,
बनसारोळा –१८ एप्रिल २०२६,नांदुरघाट – ७ मे २०२६,विडा – ८ मे २०२६,केज –१५ मे २०२६या शिबिरांमध्ये उपलब्ध प्रमुख सेवा पुढील प्रमाणे आहेत

रस्ते विषयक तक्रारींचे निवारण,जिवंत ७/१२ मोहीम,संगायो/श्रावणबाळ योजनांचे अर्ज व हयात प्रमाणपत्र, विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक दाखले,अग्री स्टक योजना ,मंजूर फेरफार प्रकरणांतील ७/१२ व उतारे वाटप, ७/१२ दुरुस्ती अर्ज,डिजिटल ७/१२ कायदेशीर वैधतेबाबत जनजागृती, भोगवटदार वर्ग २ ते वर्ग १ रूपांतरण मार्गदर्शन, तुकडेबंदी कायद्यानुसार नियमितीकरण,अकृषक (छ–) मार्गदर्शन,रेशन कार्ड विषयक अर्ज, जन्म–मृत्यू नोंद प्रमाणपत्र अर्ज,नैसर्गिक आपत्ती नुकसानभरपाई इ केवायसी,लक्ष्मी मुक्ती योजना,नवीन मतदार नोंदणी,ई–मोजणी (प्रॉपर्टी कार्ड/वारस नोंदी/नकाशे),पी एम किसान (लँड/आधार सिडिंग, ईकेवायसी), आभा कार्ड व लाडकी बहीण योजना इ केवायसी तसेच इतर सर्व प्रशासकीय अर्ज स्वीकारले जाणार आहेत तरी गावकऱ्यांनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी राकेश गिड्डे यांनी केज तालुक्यातील सर्व ग्रामस्थ,शेतकरी,विद्यार्थी व नागरिकांना आवश्यक कागदपत्रांसह संबंधित शिबिरस्थळी उपस्थित राहून या उपक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.या अभियाना च्या यशस्वी अंमल बजावणीसाठी सर्व नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी,ग्राम महसूल अधिकारी, महसूल सेवक व तहसील कार्यालयातील कर्मचारी सहभागी होणार आहेत.

शासन सेवा,आता आपल्या दारी येत आहे तरी सर्वांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# सासुरा येथील अखंड हरिनाम सप्ताहाची काल्याच्या किर्तनाने सांगता



दैनिक वादळ वार्ता
**केज | प्रतिनिधी**

दि.०६ मार्च शुक्रवारी रोजी केज तालुक्यातील सासुरा येथे श्रीसंत एकनाथ महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त काल्याचे किर्तन ह.भ.प. श्री.सुरेश महाराज जाधव यांचे झाले कार्यक्रमास पंचक्रोशीतील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन मठाधिपती ह.भ.प.रतन महाराज सासुरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. या कार्यक्रमास विडा गटाचे माजी जिल्हा परिषद सदस्य विजयकांत भैय्या मुंडे यांची विशेष उपस्थिती होती.काल्याचा कीर्तनाचा कार्यक्रम संपन्न झाला.शेवटी महाप्रसादाचा भाविक भक्तांनी लाभ घेतला. यावेळी परिसरातील गुणवान गायक,वादक यांचा संस्थानच्या वतीने सत्कार करण्यात आला.

# खड्डेमय रस्त्यांमधून रुग्णवाहिका व विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणी

दैनिक वादळ वार्ता
**जळगाव | जितु इंगळे**

नवीन निंबोल ते एनपूर विविध भागांतील रस्त्यांवर मोठमोठी खड्डे निर्माण झाल्याने नागरिकांना अक्षरशः जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. शहरभर पसरलेल्या या खड्ड्यांच्या साम्राज्यामुळे मनपा प्रशासनावर टीकेची झोड उठली आहे.शहरातील प्रमुख मार्गांसह विविध भागांतील अंतर्गत रस्त्यांची चाळणी झाली असून, पावसाळ्याअगोदरच रस्त्यांच्या दुरुस्तीची कामे जलदगतीने सुरू होतील, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली होती. मात्र वास्तव याच्या अगदी उलट दिसत आहे. अनेक रस्त्यांवर खोल खड्ड्यांमुळे वाहनचालकांना समोरचा रस्ता दिसणेही कठीण झाले आहे. दुचाकीस्वार



घसरून पडण्याच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाली असून, अपघातांत वाहनांचे नुकसान होत आहे.शहरातील सर्वाधिक वाहतूक असलेला एनपूर रोड आज खड्ड्यांमुळे जोखमीचा मार्ग ठरला आहे. त्यामुळे वाहतूक कोंडी व अपघातांची शक्यता सतत वाढत आहे. आजंदे ते जुने निंबोल परिसरातील परिस्थिती तर अधिकच बिकट आहे. काही ठिकाणी रस्ता आहे की खड्डे हेच ओळखता येत नाही. प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे नागरिकांनी स्वतःहून खडी–मुरूम टाकून खड्डे बुजवण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा खर्च करून रस्त्यांची डांबरीकरणाची कामे केली जातात, तरी काही महिन्यांतच ती पुन्हा खड्डेमय बनतात.ठेकेदारांच्या हलगर्जी कामकाजामुळे आणि मनपाच्या देखरेखीअभावी ही परिस्थिती निर्माण झाली, असा आरोप नागरिकांकडून होत आहे. स्मार्ट सिटीचा विकास फक्त फलकापुरता राहिला आहे. चालण्यासाठीसुद्धा रस्ता शाबूत नाही, अशी प्रतिक्रिया शहरवासीय देत आहेत. शहराची प्रतिमा, नागरिकांची सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी दर्जेदार डांबरीकरण करून खड्डे बुजवावेत, अशी मागणी नागरिकांनी प्रशासनाकडे केली आहे.

# नंदुरबारच्या शेतात शाश्वत तंत्रज्ञानाची पेरणी २१ गावांमध्ये 'शेतकरी क्षेत्रीय दिन' उत्साहात

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार | दिपक गोसावी**

बदलत्या हवामानाचे संकट आणि शेतीचा वाढता खर्च यावर मात करण्यासाठी नंदुरबार तालुक्यातील २१ गावांनी आता आधुनिक आणि शाश्वत शेतीची वाट धरली आहे. 'क्शन फॉर ग्रिकल्चरल रिन्यूअल इन महाराष्ट्र' (अफार्म) आणि कृषी विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'रब्बी शेतकरी क्षेत्रीय दिन' उपक्रमाला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. थेट शेताच्या बांधावर जाऊन पिकांची पाहणी आणि मार्गदर्शन केल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये नवा आत्मविश्वास निर्माण झाला आहे.

प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी २१ गावांची तीन गटांत विभागणी करण्यात आली होती. यामध्ये जळखे, रनाळे, खैराळे, वाघाळे,



लोय आणि वेळावद यांसारख्या प्रमुख गावांचा समावेश होता. या गटवार नियोजनामुळे प्रत्येक भागातील जमिनीचा पोत आणि स्थानिक समस्या ओळखून अचूक मार्गदर्शन करणे तज्ज्ञांना सुलभ झाले.वाढते तापमान आणि लहरी पावसामुळे पिकांवर येणाऱ्या कीड–रोगांचे व्यवस्थापन करण्यासाठी 'एकात्मिक कीड नियंत्रण' पद्धतीचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. महागडच्या रासायनिक फवारण्यांना फाटा देऊन पिवळे–निळे चिकट सापळे, प्रकाश सापळे आणि कामगंध सापळ्यांचा वापर कसा करावा, याचे प्रशिक्षण देण्यात आले. तसेच दशपर्णी अर्क आणि निंबोळी अर्क यांसारख्या जैविक निविष्ठांमुळे शेतीचा खर्च निम्म्यावर आणता येतो, हे प्रगतशील शेतकरी सुनील वसावे यांच्या अनुभवातून सिद्ध झाले.जमिनीचे आरोग्य जपण्यासाठी केवळ रासायनिक खतांवर अवलंबून न राहता जीवामृत, शेणकाला रबडी आणि हिरवळीच्या खतांचा वापर करण्याचे आवाहन कृषी तज्ज्ञांनी केले. गहू, हरभरा आणि कांदा या पिकांमध्ये सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता कशी ओळखावी, यावरही सविस्तर चर्चा करण्यात आली. सिंचनासाठी ठिबक आणि तुषार सिंचनासोबतच आधुनिक पर्जन्य नलिकेचा (रेन पाईप) वापर करून पाण्याची बचत करण्याचे तंत्र यावेळी समजावून सांगण्यात आले.या मोहिमेत अफार्म संस्थेचे प्रदीप साळवे, रोहित लोहार, शिवाजी पावरा तसेच कृषी विभागाचे वसंत वळवी, चंद्रकांत बागुल आणि शशिकांत गावित यांनी सक्रिय सहभाग घेऊन शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसन केले.

नंदुरबार तालुक्यातील हा प्रयोग केवळ एका हंगामापुरता मर्यादित न राहता, ती एक चळवळ बनावी असा सूर या क्षेत्रीय दिनानिमित्त उमटला. सेंद्रिय आणि वैज्ञानिक पद्धतीची सांगड घातल्यास शेती पुन्हा फायदेशीर ठरेल, असा विश्वास यानिमित्ताने व्यक्त होत आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077